मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शाळांसाठी सुरक्षित रस्ते, महापालिकेचा प्रायोगिक तत्वावर प्रकल्प

## अपघातांची संख्या कमी करण्यासाठी निगडीतील शाळेभोवती रस्त्यांची पुनर्रचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेचा शिक्षण विभाग विद्यार्थी सुरक्षेसाठी विविध उपक्रम राबवत आहे. विद्यार्थ्यांना उत्तम पायाभूत सुविधा मिळाव्यात आणि शाळेचा परिसर सुरक्षित रहावा, यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आणि ग्लोबल डिझायनिंग सिटीज इनिशिएटिव्ह यांचा संयुक्त उपक्रम सुरू आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षितता केंद्रस्थानी ठेवून या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.



पिंपरी चिंचवड महापालिकेने निगडी परिसरातील ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय या शाळेच्या आजुबाजुचे सार्वजनिक रस्त्यांची पुनर्रचना करण्यासाठी सात दिवसांचा प्रायोगिक प्रकल्प सुरू केला आहे. २० जानेवारी २०२५ पासून या प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देणे, हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

ब्लूमबर्ग फिलान्थ्रॉपीज इनिशिएटिव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी आणि ग्लोबल डिझायनिंग सिटीज इनिशिएटिव्ह यांच्या सहकार्याने महापालिका रस्त्यांच्या रचनेत सुधारणा केली जात आहे. शाळेमध्ये पायी तसेच सायकलने येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या अंतर्गत शाळा परिसरातील वाहतुकीची गती नियंत्रित करून अपघात कमी होण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. प्रकल्पांतर्गत करण्यात येणाऱ्या प्रस्तावित सुधारणांमध्ये पादचाऱ्यांना सुरक्षित रस्ता ओलांडणे शक्य व्हावे, वाहन वेग मर्यादा, विस्तारित फूटपाथ, आणि सायकल मार्ग यांचा समावेश आहे.

या प्रकल्पाच्या सात दिवसांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर पिंपरी चिंचवड महापालिका आणि ग्लोबल डिझायनिंग सिटीज इनिशिएटिव्ह या पुनर्रचनेचा प्रभाव समजून घेण्यासाठी मूल्यमापन करतील. यामध्ये रस्त्यांच्या स्थितीचा माहिती संकलित केली जाईल. त्यानुसार सुधारणा आणि वाहनांच्या वेगाबाबत अंदाज लावणे शक्य होईल.

**विद्यार्थ्यांचा घेतला अभिप्राय**

शाळेच्या आजुबाजुच्या सार्वजनिक रस्त्यांची पुनर्रचना करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आणि ग्लोबल डिझायनिंग सिटीज इनिशिएटिव्ह यांनी विद्यार्थी, परिसरातील नागरिक, शिक्षक यांच्याशी संवाद साधत त्यांना शाळेत ये-जा करताना येणाऱ्या अडचणी, रस्त्याबाबत त्यांच्या असणाऱ्या अपेक्षा समजून घेतल्या. यामध्ये रस्ता ओलांडताना येणाऱ्या अडचणी, पार्किंग, अतिक्रमणे, पायाभूत सुविधा आणि शाळेच्या परिसरातील वाहतूक अंमलबजावणी अशा विविध मुद्यांवर संवाद साधण्यात आला.

### शाळांभोवतीचा परिसर होणार अधिक सुरक्षित

» ज्ञान प्रबोधिनी विद्यालयाच्या दोन हजार विद्यार्थ्यांसाठी महापालिकेने परिसरातील रस्त्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. यामध्ये ३० टक्के विद्यार्थी पायी किंवा सायकलने शाळेत येत असल्याने, त्यांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाय केले जात आहेत. पाच हजार चौ.मी. क्षेत्र पादचाऱ्यांसाठी सुरक्षित व वाहनमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच वाहतुकीचा वेग २० किमी/प्रतीतास नियंत्रित करण्यात येणार आहे. महापालिकेच्या या प्रयत्नामुळे शाळांभोवतीचा परिसर अधिक सुरक्षित होईल, आणि हा प्रकल्प शहरातील इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरेल.

" विद्यार्थ्यांच्या प्रवासाला सुरक्षितता आणि सोयिस्करता प्रदान करणे, हे महापालिकेचे प्राधान्य आहे. हा प्रकल्प इतर शाळांमध्येही मार्गदर्शक ठरेल आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत सहाय्यभूत ठरेल. या प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित आणि आनंदायक बनवण्यावर लक्ष केंद्रित करणारा आहे.

- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका.

---

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर पुलाचे गर्डर्स बसविण्यासाठी तीन दिवस ट्रॅफिक ब्लॉक

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे जनसंपर्क अधिकारी तुषार अहिरे यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर मुंबई वाहिनीवर कि.मी 58/500 (डोंगरगाव/ कुसगांव) येथे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत बांधण्यात येणाऱ्या पुलाचे गर्डर्स बसविण्याचे काम सुरू असून 22, 23 आणि 24 जानेवारी असे तीन दिवस दुपारी 12 ते 3 या वेळेत या लांबीत ब्लॉक घेण्यात येणार असून वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे.



या कालावधीत मुंबईकडून पुण्याकडे जाणारी पुणे वाहिनीवरील वाहतूक द्रुतगती मार्गाच्या किमी क्रमांक 54/700 वळवण ते वरसोली टोल नाका (राष्ट्रीय महामार्ग क्र. 48) येथून देहूरोड मार्गे पुण्याकडे वळविण्यात येणार आहे. वरील तिन्ही दिवस दुपारी 3 वाजल्यानंतर मुंबईहून पुण्याकडे जाणारी वाहतूक पुन्हा द्रुतगती मार्गाच्या पुणे वाहिनीवरुन सोडण्यात येईल. तसेच या कालावधीत पुण्याहून मुंबईकडे जाणारी वाहतूक यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरुन सुरू राहणार आहे.

द्रुतगती मार्गावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी या अनुषंगाने आपल्या प्रवासाचे नियोजन करावे. या कालावधीदरम्यान वाहनचालकांना काही अडचण असल्यास मदतीसाठी मुंबई- पुणे द्रुतगती मार्गाच्या नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्र. 9822498224 या किंवा महामार्ग पोलीस विभागाच्या 9833498334 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महामंडळाचे जनसंपर्क अधिकारी तुषार अहिरे यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

# पुण्यात गुईलेन बॅरे सिंड्रोमचे 22 संशयित रुग्ण

## दुर्मिळ आजाराचे रुग्ण आढळल्याने खळबळ : रुग्णांचे नमुने ICMR ला पाठवले



### काय आहे गुइलेन बॅरे सिंड्रोम?

» गुइलेन बॅरे सिंड्रोम हा एक दुर्मीळ आजार आहे. तो दर वर्षी १ लाख लोकांमध्ये एका व्यक्तीला होतो. याचे निदान गुंतागुंतीचे असते. चेतासंस्थेच्या चाचण्या आणि स्पायनल फ्लुइड चाचण्या याच्या निदानासाठी आवश्यक असतात. आयव्हीआयजी अथवा प्लाझ्मा एक्स्चेंजसारख्या उपचारांमुळे रुग्णाला लवकरात लवकर मदत मिळू शकते. या आजाराचे बहुतेक रुग्ण बरे होत असले, तरी २० टक्के रुग्णांना सहा महिन्यांनंतरही हालचालींमध्ये अडचणी येतात.

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून पुण्यात गुइलेन बॅरे सिंड्रोम या अतिशय दुर्मिळ अशा व्याधीची मोठी चर्चा पाहायला मिळत आहे. एका महिलेला या व्याधीनं ग्रासल्यानंतर डॉक्टरांच्या पथकानं तिच्यावर यशस्वीपणे उपचार केल्यामुळे तिने त्यावर मात केल्याचं वृत्तही समोर आलं होतं. पण आता पुण्यात या दुर्मिळ व्याधीचे तब्बल २२ संशयित रुग्ण आढळल्याचं समोर आलं आहे. पुणे महानगर पालिकेकडे अशा प्रकारचे २२ संशयित रुग्ण आढळल्याची माहिती देण्यात आली आहे.

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय व पूना हॉस्पिटलमध्ये या आजाराशी संबंधित लक्षणं आढळल्याची तक्रार असणारे रुग्ण दाखल झाल्यानंतर ही माहिती महानगर पालिकेला कळवण्यात आली आहे.

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय व पूना हॉस्पिटल या दोन रुग्णालयांमध्ये या व्याधीशी संबधित लक्षणं दिसून आल्याची तक्रार घेऊन रुग्ण दाखल झाले आहेत. हे रुग्ण प्रामुख्याने सिंहगड रोड परिसरातले असल्याचं इंडियन एक्स्प्रेसनं दिलेल्या वृत्तात म्हटलं आहे. या दोन रुग्णालयांव्यतिरिक्त इतरही रुग्णालयांमध्ये काही संशयित रुग्णांना दाखल करण्यात आलं आहे.

**प्रशासन सज्ज, संबंधित परिसरात पथक पाठवणार!**

दरम्यान, पुणे महानगर पालिकेच्या सहायक वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली जाधव यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. तसेच, संबंधित परिसरात परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी एक पथक पाठवण्यात येईल, असंही त्यांनी नमूद केलं आहे. “सध्या आम्ही या भागातील एकूण सहा रुग्णांच्या रक्ताचे नमुने गोळा केले आहेत. हे सर्व नमुने इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च – नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ व्हायरोलॉजी (ICMR-NIV) कडे पाठवण्यात आले आहेत”, अशी माहिती डॉ. वैशाली जाधव यांनी दिली आहे.

**डॉक्टरांनी केला ‘या’ लक्षणांचा उल्लेख!**

एकीकडे २२ संशयित आढळले असताना दुसरीकडे काही डॉक्टरांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना काही ठराविक लक्षणांचा उल्लेख केला आहे. सिंहगड रस्ता आणि आसपासच्या परिसरातील रुग्णांकडून जुलाब, ताप आणि अशक्तपणासारख्या तक्रारी केल्या जात आहेत. “या रुग्णांना गुईलेन बॅरे सिंड्रोमची लागण झाल्याचं दिसून आलं”, अशी माहिती दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे सल्लागार डॉ. समीर जोग यांनी दिली.

गेल्या आठवड्याभरातच दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल झालेल्या १६ रुग्णांनी ही लक्षणं जाणवत असल्याचं सांगितलं. त्यात सहा लहान मुलांचा समावेश आहे. हे सर्व रुग्ण धायरी, सिंहगड रोड आणि किरकटवाडी परिसरातले होते. या १६ पैकी ८ रुग्णांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आलं आहे, अशी माहितीही डॉ. जोग यांनी दिली आहे. दुसरीकडे पूना हॉस्पिटलमध्ये तीन रुग्ण दाखल झाल्याची माहिती रुग्णालयाचे कन्सल्टिंग इंटेन्सिव्हिस्ट डॉ. अजित तांबोळकर यांनी दिली. “रुग्णालयात अशा प्रकारचे तीन रुग्ण असून ते सिंहगड रोड व माणिक बाग परिसरातले आहेत”, असं ते म्हणाले.

# सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध

## आमदार महेश लांडगे : सोसायटी फेडरेशनच्या ‘महासंमेलन’ला उत्स्फूर्त प्रतिसाद



> “एक है तो सेफ है..” असा नारा जो पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. त्याचा खरा अर्थ सोसायटीधारकांनी जाणला आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत सोसायटीधारकांनी एकजुट केली आणि माझ्या पाठीशी ताकद उभा केली. आगामी काळात सोसायटीधारकांच्या न्याय हक्कांसाठी कायम आग्रही राहण्याचा संकल्प आम्ही केला आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

माझ्या संघर्षाच्या काळात सोसायटीधारक नागरिकांनी मला साथ दिली. त्यांच्या समस्या आणि अडचणी सोडवण्यासाठी कायम प्राधान्य देण्यात येईल. रक्ताची नाती नसतानाही ही आपुलकीचे नाते तयार झाले. विधानसभा निवडणुकीत सोसायटीधारकांच्या मदतीमुळेच मी विजयाची ‘हॅट्रिक’ करु शकलो. याबाबत सोसायटीधारकांसोबत कृतज्ञता व्यक्त करतो, अशा भावना भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.

चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनच्या माध्यमातून शहरातील सोसायटीधारकांसाठी “महासंमेलन-2025” आयोजित करण्यात आले. यावेळी आमदार लांडगे बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे, सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांच्यासह फेडरेशनचे पदाधिकारी आणि हजारोंच्या संख्येत सोसायटीधारक उपस्थित होते. विशेष म्हणजे, “जय जय महाराष्ट्र माझा..” हे महाराष्ट्र गीत गाऊन आमदार महेश लांडगे यांनी उपस्थित सोसायटीधारकांची मने जिंकली.

पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी मनोगतात फेडरेशनच्या कामाचे आणि त्यांच्या एकजुटीचे कौतुक केले. प्रभुणे म्हणाले की, चिंचवडमध्ये क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीच्या माध्यमातून शोषित वंचित घटकांसाठी काम केले जाते. या शहराने अशा घटकांसाठी मोठे काम केले आहे. चोऱ्यामाऱ्या करणारी मुले आज शिकतात, मोठी होतात तेव्हा या शहराचे दातृत्व दिसून येते.

सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे म्हणाले की, चिखली मोशी सोसायटी फेडरेशनच्या माध्यमातून या भागातील सोसायटी धारकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. उपयोग कर्ता शुल्क नागरिकांच्या माथी मारली जात असताना फेडरेशनने भूमिका घेतली. आमदार महेश लांडगे यांची साथ या भूमिकेला लाभली. यांच्या माध्यमातून हे शुल्क रद्द झाले. अशी अनेक नागरिकांच्या उपयोगाची कामे फेडरेशनच्या माध्यमातून केली जातात. त्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून या भागातील आमदारांची खंबीर साथ लागते. म्हणूनच ही अराजकीय फेडरेशन असतानाही संपूर्ण फेडरेशन आमदार लांडगे यांच्या पाठीशी कायमच खंबीरपणे उभे आहे. आगामी काळातही पार्किंग रस्ते ,पाणी, विकसक आणि सोसायटी धारक यांचे प्रश्न सोडवण्यासाठी फेडरेशनच्या माध्यमातून काम केले जाणार आहे, असेही सांगळे यांनी भाषणात नमूद केले.

# महापालिकेत झाली तब्बल 7 कोटी 42 लाख रुपयांची बचत

## महासभेच्या बैठकीत प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांची विविध विषयांना मंजुरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यभरात मागील ३ वर्षांपासून स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. नगरसेवक नसल्याने प्रशासकीय राजवटीत पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या खर्चात बरीच बचत झाली आहे. त्यामुळे एकूण १३३ नगरसेवकांचे मानधन व भत्ता, चहापानावर होणारा तब्बल ७ कोटी ४२ लाखांचा खर्च वाचा आहे. तसेच, दालनातील अनेक कर्मचारी इतर विभागांसाठी उपलब्ध झाले आहेत, तर दुसरीकडे प्रशासकीय राजवटीत महापालिकेचे कामकाज सुसाट सुरू आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेत सध्या प्रशासकीय राजवट सुरू आहे. महापालिकेची पंचवार्षिक मुदत १२ फेब्रुवारी २०२२ पर्यंत होती. त्यापूर्वी महापालिकेची निवडणूक न झाल्याने राज्य शासनाने महापालिका आयुक्तांनाच प्रशासक म्हणून नेमले आहे. नगरसेवक व पदाधिकारी नसल्याने महापालिकेचा कारभार १३ फेब्रुवारी २०२२ पासून प्रशासकांमार्फत सुरू आहे. नगरसेवकांना दरमहा १५ हजार रुपये मानधन दिले जाते. तसेच, विविध सभा व बैठकांचा प्रत्येकी १०० रुपये भत्ता दिला जातो. हा भत्ता महिन्यास अधिकाधिक ४०० रुपये इतका आहे.

महापालिकेत ३२ प्रभागातून निवडून आलेले एकूण १२८ नगरसेवक होते, तर ५ स्वीकृत असे एकूण १३३ नगरसेवक होते. मानधन १५ हजार आणि साधारण २०० रुपये सभा भत्ता धरून प्रत्येक नगरसेवकाला १५ हजार २०० रुपये मानधन होते. हे मानधन महापालिकेच्या नगरसचिव विभागाकडून प्रत्येक नगरसेवकांच्या बँक खात्यात जमा केले जात होते.

मात्र सध्या नगरसेवकच नसल्याने मानधनाचे वितरण बंद आहे. आतापर्यंत ३५ महिन्यांपासून प्रशासकीय राजवट सुरू आहे. या कालावधीतील या नगरसेवकांचे मानधन तब्बल ७ कोटी ०७ लाख ५६ हजार रुपये होते, तर महापौर, उपमहापौर, स्थायी समिती, सत्तारूढ पक्षनेते, विरोधी पक्षनेते, शिक्षण, क्रीडा, विधी, शहर सुधारणा, महिला व बालकल्याण, शिवसेना व मनसे गटनेते, जैवविविधता समिती, वृक्ष प्राधिकरण समिती आदींच्या पदाधिकारी व सदस्यांच्या चहापानावर दर महिन्यास सुमारे १ लाखापेक्षा अधिक खर्च होत होता. तो ३५ महिन्यांचा साधारण ३५ लाख इतका खर्च होतो. असे एकूण ७ कोटी ४२ लाख ५६ हजार रुपयांची बचत झाली आहे. सर्वसाधारण सभेचे दर महिन्याचे विषयपत्रक प्रत्येक नगरसेवकांचे घर व जनसंपर्क कार्यालयात नेऊन दिले जात होते. ते काम सध्या बंद आहे.




### दालनातील कर्मचारी इतर विभागात

**» महापालिकेत महापौर, उपमहापौर, स्थायी समिती, सत्तारूढ पक्षनेते, विरोधी पक्षनेते, शिक्षण, क्रीडा, विधी, शहर सुधारणा, महिला व बालकल्याण तसेच, शिवसेना, मनसे, अपक्ष गटनेते, जैवविविधता व्यवस्थापन समिती यांना स्वतंत्र दालन होते. त्या पदाधिकाऱ्यांना महापालिका वाहन उपलब्ध करून देत होते. तसेच, स्वीय साहाय्यक, टंकलेखक व कर्मचारी नेमण्यात आले होते. नगरसेवक नसल्याने ही दालने बंद करण्यात आली आहेत. तेथील कर्मचारी इतर विभागात वर्ग करण्यात आले आहेत. त्यामुळे मनुष्यबळाची बचत झाली आहे. काही दालनात अधिकाऱ्यांनी स्वत:च्या विभागाचे कार्यालय सुरू केले आहे.**

### प्रशासकच बनले सर्वेसर्वा

**» प्रशासकीय राजवटीत नेहमीप्रमाणे कामकाज सुरू आहे. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह हेच सर्वसाधारण सभा आणि स्थायी समितीचे निर्णय घेत आहेत. त्यामुळे विविध कामांना तत्काळ मंजुरी मिळत आहे. गेल्या तीन वर्षांच्या प्रशासकीय राजवटीत अंदाजे ३ ते ४ हजार कोटींपेक्षा अधिक खर्चाच्या विविध कामांना मंजुरी दिल्याचा अंदाज आहे. विविध कामांना विनाअडथळा मंजुरी मिळत असल्याने अधिकारी वर्ग खूश आहे. तसेच, निधी कमी पडत असल्यास अर्थसंकल्पात इतर कामांतून ती वळती करण्याचे प्रकारही वाढले आहेत. प्रभागातील कामांसाठी राजकीय पक्षाचे पदाधिकारी व माजी नगरसेवक आयुक्त व अधिकाऱ्यांना भेटत आहेत. मात्र, हे प्रमाण आता कमी झाले आहे.**

# वेबसाईटच्या तांत्रिक अडचणीमुळे मनस्ताप; वाहन परवाने, ऑनलाईन कामे ठप्प

## नागरिकांकडून वर्षाच्या पहिल्या महिन्यातच ऑनलाइन कामाबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

आरटीओच्या काही सेवांबाबत कार्यालयात न येता (फेसलेस) कामे करण्यावर भर दिला जात आहे. पण, गेल्या काही दिवसांपासून संकेतस्थळाला येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे नागरिक त्रस्त आहेत. त्यात रस्ता सुरक्षा अभियांतर्गत वेगवेगळे उपक्रम राबवण्यात येत आहेत. मात्र, नागरिकांकडून वर्षाच्या पहिल्या महिन्यातच ऑनलाइन कामाबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

परिवहन विभागाचे (आरटीओ) 'सारथी' आणि 'वाहन' हे दोन्ही संकेतस्थळ स्लो झाले असल्याने कागदपत्रे अपलोड करताना आणि ऑनलाइन पेमेंट करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे परमिट, शिकाऊ आणि पक्का वाहन परवाना काढणाऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागला. दरम्यान, पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयाचा दर्जा वाढला आहे. तरी अनेक समस्या मार्गी लागल्या नाहीत. गेल्या वर्षापासून आरटीओचे कधी 'सारथी' तर कधी 'वाहन' संकेतस्थळ बंद पडते, सुरू झाले तरी आठ ते दहा दिवसांनंतर पुन्हा दिवसातून एक-दोनदा संकेतस्थळाचे सर्व्हर डाउन होते. त्यामुळे ऑनलाइन अर्ज केल्यानंतर पेमेंट न होणे, नवीन शिकाऊ, पक्का वाहन परवाना काढणे, कर्जाचा बोजा चढवणे-उतरवणे, डुप्लिकेट परवाना कामे ठप्प होतात.

या वर्षात आरटीओमधील नागरिकांसंबंधित असलेले प्रश्न मार्गी लागतील असे आश्वासन प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण यांनी मोटर ड्रायव्हिंग स्कूल असोसिएशनच्या बैठकीत दिले होते. मात्र, वर्षाच्या पहिल्याच महिन्यामध्ये ऑनलाइन कामे जलद होत नाहीत. परिणामी, वाहन परवानांसोबत अनेक काम रखडली आहेत.




### मुंबईतील अधिकारी नियुक्ती करूनही कामे होईना

**» मुंबईतील परिवहन कार्यालयातील संगणक विभागातील परिवहन उपायुक्त म्हणून नेमणूक असलेले संदेश चव्हाण यांची पिंपरी-चिंचवड येथे नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना प्रत्यक्षात ऑनलाइन आणि टेक्निकल कामांचा सर्वाधिक अनुभव आहे. मात्र, तरीदेखील या कार्यालयाला अनेक तांत्रिक समस्याला सामोरे जावे लागत आहे.**

### वरिष्ठ आरटीओची पदे रिक्त

**» पिंपरी-चिंचवड आरटीओमध्ये २ उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आणि ४ साहाय्यक परिवहन अधिकारी अशा पदांची गरज आहे. प्रत्यक्षामध्ये एकच उपप्रादेशिक अधिकारी अन् दोन साहाय्यक अधिकारी रुजू आहेत, तर आणखी एक अधिकाऱ्याची बदली होऊन ते पदही रिक्त आहे. त्यामुळे नागरिकांची कामे होत नाहीत.**

# एचएससी, एसएससी बोर्डाची 'जाती'वरून माघार

## हॉल तिकिटांवर जातीच्या प्रवर्गाचा (कास्ट कॅटेगरी) उल्लेख करण्याचा निर्णय रद्द करण्यात आला

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून (एसएससी-एचएससी बोर्ड) परीक्षेसाठी दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना हॉल तिकीटचे वितरण करण्यात आले. त्यात हॉल तिकिटांवर जातीच्या प्रवर्गाचा (कास्ट कॅटेगरी) उल्लेख करण्याचा निर्णय करण्यात आला. त्यामुळे सर्व स्तरातून टीकेची झोड उठविण्यात आली, पण टीकेनंतर बोर्डाकडून दिलगिरी व्यक्त करत हा निर्णय रद्द करण्यात आला आहे.

या वर्षीपासून दहावी आणि बारावीच्या या हॉल तिकिटामध्ये काही बदल करण्यात आले. यातील एका बदलावर शिक्षण क्षेत्रातून प्रश्न उपस्थित केले जात होते. हॉल तिकिटांवर यंदा विद्यार्थ्यांची जन्मतारीख आणि कास्ट कॅटेगरी या दोन रकान्यांचा नव्याने समावेश करण्यात आला. यातील कास्ट कॅटेगरीच्या रकान्यात संबंधित विद्यार्थ्याच्या जातप्रवर्गाचा उल्लेख करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या हॉल तिकिटावर जातसंवर्गाच्या उल्लेखाची गरज काय, असा प्रश्न शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते आणि राजकीय विरोधकांनी उपस्थित केला होता. दरम्यान, "हा बदल विद्यार्थी आणि पालकांना जात प्रवर्गाच्या माहितीत वेळीच दुरुस्ती करण्याची संधी मिळावी यासाठी करण्यात आला आहे," असं स्पष्टीकरण आधी बोर्डाकडून देण्यात आलं होतं. येत्या २३ जानेवारीपासून नव्याने सुधारित हॉल तिकीट वितरित केले जाणार आहे.

सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी म्हणाले, "महाराष्ट्रात आधीच जात आणि आरक्षण या मुद्यावरून वातावरण खराब झाले असताना असा निर्णय घेण्यापूर्वी एसएससी बोर्डाने विचार करायला हवा होता. कोणत्याही परीक्षेत गोपनीयता महत्त्वाची असते. अनेकदा पेपरवर विद्यार्थ्याचे नाव नसते, त्यावर स्टीकर लावले जाते. बारकोड लावला जातो. विद्यार्थ्याची ओळख इतकी गोपनीय ठेवली जात असताना जातप्रवर्गाचा उल्लेख कशासाठी? संबंधित वर्गातील पर्यवेक्षकास विद्यार्थ्यांची जात समजल्यास परीक्षेदरम्यान भेदभाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही."

या निर्णयाच्या परिणामांचा विचार संबंधितांनी करणं अपेक्षित होतं. तसंच हॉल तिकीट हे पंधरा दिवसांसाठीच असतं. परीक्षेपुरताच याचा उपयोग आहे. मग याचा नेमका फायदा कशासाठी होणार आहे, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.



### विद्यार्थी आणि पालकांना मदत होण्याच्या उद्देशाने घेतला होता निर्णय : बोर्ड

» या संदर्भात शरद गोसावी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाचे अध्यक्ष स्पष्टीकरण करताना म्हणाले, "हॉल तिकिटामध्ये हा बदल विद्यार्थी आणि पालकांना मदत व्हावी, या हेतूने करण्यात आला होता. दहावी आणि बारावीची परीक्षा सुरू होत आहे. विद्यार्थ्यांना हॉल तिकीट देण्यासाठी ऑनलाईन प्रक्रिया शाळांसाठी उपलब्ध करून दिलेली आहे. शाळांनी विद्यार्थ्यांना ते डाऊनलोड करून द्यायचे आहेत. हॉल तिकीट तयार करत असताना विद्यार्थ्याचे नाव, आईचे नाव, विद्यार्थ्याने घेतलेले विषय, वेळापत्रक, परीक्षेची वेळ दिलेली आहे. तसंच जातीचा प्रवर्ग त्यात दिलेला आहे. विद्यार्थ्यांना दहावीनंतर किंवा बारावीनंतर शिष्यवृत्तीसाठी समाजकल्याण विभाग, आदिवासी विभाग या विभागांना माहिती द्यावी लागते. यानुसार शिष्यवृत्ती मिळते. यात विद्यार्थ्यांच्या शाळेच्या जनरल रजिस्टरवर जर प्रवर्ग व्यवस्थित असेल तर शिष्यवृत्ती मिळण्यास सहज शक्य होते."

### जातीधिष्ठित व्यवस्था निर्माण करणे आहे काय?

» शिवसेना ठाकरे गटाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनीही यावर टीका केली आहे. शिक्षणमंत्र्यांनी या प्रकरणी उत्तर द्यावं अशीही मागणी त्यांनी केली आहे. अंधारे म्हणाल्या, "दहावी आणि बारावी शैक्षणिक आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचे टप्पे आहेत. या वयात सर्वसमावेशक समता मूल्यांचा समाजव्यवस्थेचा संस्कार होणं अपेक्षित असतं. परंतु याच काळात शिक्षण मंडळाकडून मुलांच्या प्रवेशपत्रावर जातीची नोंद होणार असेल तर शिक्षण मंडळाचा उद्देश जात निर्मूलन किंवा सर्वसमावेशक समतामूलक व्यवस्था प्रस्थापित करणे आहे की, जातीधिष्ठित व्यवस्था निर्माण करणे आहे, याचे उत्तर शिक्षणमंत्र्यांनी द्यावे," असं त्या म्हणाल्या.

### ...म्हणून केला होता जातीचा उल्लेख : शिक्षण राज्यमंत्री

» शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सांगितले की, "हॉलतिकीटावर केवळ जातीचा उल्लेख नाही. संपूर्ण माहिती त्यावर दिलेली आहे. कारण बरेचदा विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण झाल्यावर त्याच्या प्रमाणपत्रावर जातीचा उल्लेख चुकीचा असल्याचे लक्षात येतो. त्यानंतर ते दुरुस्तीसाठी फार त्रास होतो. त्यामुळे आता हॉल तिकिटावर जातीचा उल्लेख करण्यात आला. त्यामागे शिक्षण विभागाचा एकच उद्देश आहे. तो म्हणजे, जर पालकांनी हॉल तिकीट पाहिले आणि त्यांना वाटले की यात पाल्याच्या जातीबाबत चुकीची माहिती आली आहे तर ती शाळेतून दुरुस्त करता येईल. यामुळेच हॉल तिकिटावर जातीचा उल्लेख करण्यात आला, असे पंकज भोयर यांनी म्हटले आहे.".

# केशवनगर-मांजरी रस्त्याचे 20 कोटी पाण्यात? वाहतूक कोंडी अद्यापही कमी नाही

## महापालिकेला रस्ता अतिक्रमण मुक्त करण्यास अपयश आल्याचा नागरिकांचा आरोप

**पुणे | प्रतिनिधी**

केशवनगर-मांजरी रस्त्यावरील अतिक्रमण हटवून रस्त्याच्या रुंदीकरणाचे महापालिकेने हाती घेतले होते. काही भागातील अतिक्रमण हटवून जागा ताब्यात घेण्यात आली. परंतु त्यावर पुन्हा अतिक्रमण केल्याचे दिसून येत असून या रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी अद्यापही कमी झालेली नाही. त्यामुळे २० कोटी रुपये खर्च करूनही महापालिकेच्या पथ विभागाला हा रस्ता सलग आणि सुरळीत करण्यास अपयश आले आहे, असा आरोप येथील नागरिकांनी केला आहे.

खराडी बायपास रस्त्यावरील मुंढवा गावातील महात्मा फुले चौकात अतिक्रमणविरोधी धडक कारवाई करण्यात येऊन रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले. या चौकातून केशवनगर-मांजरी रस्ता जातो. या भागातील लोकसंख्या झपाट्याने वाढल्याने वाहनांची संख्याही लक्षणीयरित्या वाढली आहे. परिणामी वाहतूक कोंडी वाढली. केशवनगर-मांजरी या गावांचा महापालिकेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे पालिकेकडून या गावांना पायाभूत सुविधा मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र पालिकेकडून या सुविधादेखील मिळत नसल्याने गावकरी त्रासले आहेत. केशवनगरमध्ये लोकवस्ती झपाट्याने वाढली आहे. या भागात मोठ मोठ्या इमारती उभारण्यात आल्या आहेत. तसेच अनेक अनधिकृत इमारती उभारल्या गेल्या आहेत. इमारती बांधताना कोणतेही नियोजन करण्यात आलेले नाही. इमारतींची संख्या, राहण्यास येणाऱ्या कुटुंबांची संख्या तसेच रस्त्यावर वाढणारी वाहनांची संख्या याचा कोणताही विचार न करता रस्ते अरुंद आहेत. त्यामुळे या भागात सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. याबाबत पथ विभागाच्या अधिकाऱ्यांना फोन केला असता संपर्क होऊ शकला नाही.

केशवनगर-मांजरी रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात येऊन त्यानंतर डांबरीकरण करण्यात आले आहे. काही ठिकाणावरील जागा महापालिकेने ताब्यात घेतली, पण केवळ ठिगळे मारण्याचे काम केले आहे. तसेच काही दुकानदारांनी जागा ताब्यात जागा देण्यास नकार दिल्याने इतरांनीदेखील मोकळ्या जागेवर पुन्हा अतिक्रमण केले आहे.




### रस्त्याची दुरवस्था

- केशवनगर-मांजरी रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे.
- मात्र काही ठिकाणी रस्त्यावर खड्डे पडले आहेत
- कनेक्शन घेण्यासाठी ठिकठिकाणी रस्ता खोदण्यात आला आहे
- विद्युत खांब तसेच आहेत, त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो
- वाहतुकीच्या वर्दळीमुळे वाहतूक कोंडी
- प्रमाणात पाण्याच्या टँकरची वाहतूक होत असल्याने रस्त्यावर पाणी
- दुभाजक नसल्याने आडवी तिडवी वाहने चालविली जात असल्याने वाहनचालकांना होतोय त्रास